# FIRST INFORMATION REPORT

**पहिली खबर**

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

Form : 1-A

No. 0025090

1. * Dist. जिल्हा भंडारा * P.S. पोलीस ठाणे लाखनी *Year वर्ष २०१८ *FIR No. पहिली खबर क्र. २६१/१८ *Date तारीख १०/१०/२०१८

2. (i) *Act अधिनियम ला.प्र.का. सन १९८८ *Sections कलमे ७,

(ii) *Act अधिनियम (सुधारीत अधिनियम २०१८) *Sections कलमे —

(iii) *Act अधिनियम — *Sections कलमे —

(iv) *Other Acts & Sections इतर अधिनियम व कलमे —

3.(a) *Occurence of Offence : अपराधाची घटना *Day वार मंगळवार *Date from तारीख पासून ०९/१०/२०१८ *Date To तारीख पर्यंत ०९/१०/२०१८

*Time Period वेळेचा अवधी दुपारी *Time From पासून १४.४५ *Time To पर्यंत १५.४५ वा. दरम्यान

(b) Information received at P.S.Date पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख १०/१०/२०१८ *Time वेळ १७.३८ वा.

(c) General Diary Reference Entry No. (s) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक ३९/२०१८ *Time वेळ १७.३९ वा.

4. Type of information : माहितीचा प्रकार ~~लेखी~~ अशू मार्गाने लाच मागणी व लाच स्विकारल्याचा प्रयत्न. Written / Oral : लेखी/तोंडी लेखी.

5. Place of Occurrence : (a) * Direction and Distance from P.S. घटनेचे ठिकाण पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर १ K.m. पश्चिम Beat No. गस्तक्षेत्र क्र. मुरमाडी बिट.

(b) *Address: पत्ता तहसिल कार्यालय लाखनी.

(c) *In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. पोलीस ठाणे ........ Dist.: जिल्हा ........

6. Complainant /Informant :
तक्रारदार / खबरी

(a) Name नाव श्री. प्रविण बोरीकर

(b) Father's/ Husband's Name पित्याचे / पतीचे नाव तिवराज बोरीकर

(c) Date/Year of Birth : जन्म तारीख / वर्ष ३७ वर्ष (d) Nationality : राष्ट्रीयत्व भारतीय

(e) Passport No. : पारपत्र क्र. — Date of Issue : दिल्याची तारीख — Place of Issue दिल्याचे ठिकाण —

(f) Occupation : व्यवसाय शेती.

(g) Address : पत्ता रेंगेपार (कोठा) ता. लाखनी जि. भंडारा.

# फिर्याद

दिनांकः–१०/१०/२०१९.

मी श्री. प्रविण हिवराज बोरीकर, वय ३१ वर्षे धंदा– शेती रा. रेंगेपार (कोठा) ता. लाखनी जि. भंडारा.

मी दिनांक २४/०९/२०१९ रोजी माझे मित्र श्री. राजु वामन सार्वे याचेसोबत पोलीस निरीक्षक श्री. पुरूषोत्तम अहेरकर, ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

''मी तक्रारदार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे माझे मित्र श्री. राजु वामन सार्वे रा. रेगेपार (कोठा) यांचे सह समक्ष हजर येवुन तोंडी तक्रार देतो की, मी वर नमुद पत्त्यावर राहतो व शेती चे काम करतो.

माझे वडील नामे श्री. हिवराज बाळकृष्ण बोरीकर हे दि. २७/०१/२०१६ रोजी मरण पावले. माझे वडीलांची वडीलोपार्जीत शेतजमीन मौजा चिखलाबोडी ता. लाखनी जि. भंडारा येथे एक हेक्टर आहे. वडीलांचे मृत्यु नंतर त्याचे कायदेशिर वारसदार मी, माझा भाऊ दिवाकर हिवराज बोरीकर व आई श्रीमती सुमीत्रा हिवराज बोरीकर, रा. रेंगेपार व बहीणी सौ. पपीता किशोर कांबळे रा. बासोरा ता.+जि. भंडारा आणि सौ. सरिता राजहंस लाटकर रा. मुरूपार ता. भिवापुर जि. नागुपर असे पाचही वारसदार आहोत.

माझे वडील मरण पावल्या नंतर, वडीलांचे नावाने असलेली वडीलोपार्जीत वरील शेतजमीन वर वारसांनचे नावे चढवुन फेराफार करण्याकरीता, सर्व कागदपत्रांची पुर्तता करून व वासरसान पत्र घेवुन मी तलाठी कार्यालय गडेगाव येथे गेलो. तलाठी श्री. चवरे साहेब, यांना गडेगाव येथे त्याचे कार्यालया मध्ये काल दि. २३/०९/२०१९ चे दुपारी १२.०० वा. चे दरम्यान जावुन भेटुन त्यांना आमचे वडीलांचे नावाची वरील शेतजमीनीचे रेकॉर्ड वर आमचे वारसानचे नावे चढवायचे सांगुन, त्याचे फेरफार करण्याकरीता सोबत असलेले सर्व कागदपत्रे त्यांना अर्जासह सादर केले. त्यानंतर चवरे साहेब यांनी माझेकडून स्वयंघोषना पत्र भरून त्यावर माझी सही घेतली.

त्यानंतर तलाठी चवरे साहेब यांनी मला म्हटले की, तुझ्या वडीलांच्या जमिनीवर तुमचे वारसानचे नावे चढविण्यासाठी त्यांनी मला १०००/– रूपये देण्यास म्हटले. त्यावेळी मी त्यांना "या कामाचे पैसे भरावे लागत नाहीत ना" असे त्यांना म्हटले. त्यावर त्यांनी मला म्हटले की, तु मला १०००/– रूपये दिले, तरचं मी तुमचे नावे चढवुन फेरफार करून देईन तेव्हा माझी त्यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना माझे जवळ आत्ता १०००/– रूपये नसुन फक्त २००/– रूपयेचं आहेत असे म्हटले, तर त्यांनी सध्दा २००/– रूपये देवुन दे, बाकीचे उदया मला आणुन देशिल तरचं तुझे काम होईल असे म्हटले. ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थीतीमुळे मी माझे जवळील २००/– रूपये तलाठी चवरे साहेब यांना दिले.

आमच्या वडीलोपार्जित शेतजमिनीवर वारसान चढवुन फेरफार करून देण्याकरीता पैसे भरण्याची गरज नसतांनाही गै.अ. श्री. चवरे साहेब तलाठी साझा गडेगाव यांना उर्वरीत ८००/–, रूपये देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. तसेच माझे त्यांचे सोबत कोणतेही जुणे वादविवाद नसुन त्यांच्याशी आर्थीक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाही. तरी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यास विनंती असल्याची तक्रार नोंदविली. ती मी वाचुन बघितली, माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करून त्यावर सही केली.

वरिल तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर, साहेब यांनी लाचेच्या संबंधाने पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना ला. प्र. वि. च्या कार्यालयामध्ये कार्यवाही कामी बोलावून घेतले. त्यांचे समक्ष मी दिलेली तोंडी तक्रार पंचाना

प्रविन बोरीकर ।

(2)

**Form : 1-B**

7. Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0025090

आरोपी नाव := श्री. राहुल ज्ञान चवरे वय ४२ वर्षे पद- तलाठी साजा क्र. ०२ तलाठी कार्यालय गडेगाव ता. लाखनी जि. भंडारा. रा. प्लॉट क्र.३३ गंगानगर खात रोड भंडारा.

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | | | | | |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

वाचण्याकरीता दिली व पंचानी वाचुण व मला विचारपुस कयन खात्री केली व तक्रारवर त्य सहया केल्या. पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या.

त्यानंतर दिनांक २४/०९/१९ रोजीच पडताळणी कार्यवाही दरम्यान, श्री. चवरे तलाठी गडेगाव यांनी मला माझे मृत वडीलांचे नावे असलेली मौजा चिखलाबोडी येथील एक हेक्टर शेतजमीन वारसदारांचे नावाने फेरफार करण्यासाठी चवरे तलाठी यांनी मला तहसिल कार्यालय लाखनी येथे सोबत असलेला पंच व माझा मित्र राजु याचे समोर ५००/— रूपये लाचेची मागणी करून, ५००/— रूपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. मी पंचासह परत आल्यावर श्री. अहेरकर, साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली. त्याबाबत अहेरकर साहेब यांनी सविस्तर पंचनामा तयार केला.

त्यांनतर दिनांक २४/०९/१९ रोजीच मी ज्यात १००/— रू. च्या ५ नोटा असे ५००/— रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर साहेब आणि दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यांनी त्याचेवर पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्याबाबत अहेरकर साहेब यांनी सविस्तर पंचनामा तयार केला.

दिनांक २५/०९/१९ रोजी मी असीबी कार्यालयामध्ये हजर होवुन सापळा अधिकारी यांना माहीती दिली की, माझे मित्र राजु सार्वे हे काही महत्वाचे कामाने बाहेर गावी गेले असुन, ते उशीरापर्यंत लाप्रवि कार्यालय भंडारा येथे उपस्थीत होतील आणि पाऊस सुरू असल्यामुळे मला येण्यास उशीर झाला, माझ्यासोबत आलेला माझा मित्र राजु सार्वे यांनी आज सकाळी माझ्या घरी येवुन मला माहीती दिली की, त्यांना काल दिनांक २४/०९/१९ च्या रात्री अंदाजे नऊ वाजता फोन करून श्री. रामटेके, तलाठी गोंडसावरी यांचा फोन आला होता व तो तलाठी माझ्या मित्राला म्हणाला की 'प्रविण बोरीकर याचे सोबत तुम्ही अॅन्टी करप्शन ला जावुन चवरे तलाठी यांची तक्रार केली का, त्यावर त्याने त्यांना सांगितले की प्रविण बोरीकर माझा मित्र आहे त्याच्या वडीलांच्या नावाच्या शेतीची वारसानच्या नावाने फेरफार घेण्यासाठी चवरे तलाठी प्रविण ला दोनशे रू. दिल्यानंतरही पुन्हा पाचशे रू. मागत आहे. त्यामुळे आम्ही तक्रार केले आहे असे सांगितले. तसेच आज सकाळी पुन्हा रामटेके तलाठी यांनी राजुला फोन करून प्रविण बोरीकर कुठे आहे. त्यांना मला व चवरे साहेबाला याबाबत भेटायचे आह असे विचारले. अशी माहीती माझ्या मित्राने मला सांगितली. यावरून गैरअर्जदार श्री. चवरे तलाठी यांना मी दिलेल्या तक्रारीची शंका आल्याने, तसेच माझ्या मित्राने त्यांनी विचारले वरून फोनवर त्यांना तक्रार केली असल्यासचे सांगितल्याने ते आता माझ्याकडुन लाच रक्कम पाचशे रूपये घेणार नाही असे सांगीतले.

वरील प्रमाणे मी पंचासमक्ष दिलेल्या माहीती वरून श्री. चवरे तलाठी यास मी केलेल्या तक्रारी बाबत खरोखर संशय आला किंवा माहीती झाली या बाबत निश्चित ठरविणे करीता आधी ठरल्याप्रमाणे आणि पडताळणी पंचनामा प्रमाणे श्री. चवरे तलाठी, तलाठी कार्यालय गडेगाव यांनी मला ''माझ्या वडीलांचे नावाने असलेली शेती, वारसानाचे नावे फेरफार करण्यासाठी पाचशे रूपये ५००/— रूपये, लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने दिनांक २५/०९/२०१९ रोजी मी, दोन्ही पंच व सापळा पार्टिसह खुटसावरी फाटा शेतशिवारात पोहचुन तेथुन पुढील सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्या आले.

सापळा कार्यवाहीदरम्यान सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेबांनी खुट सावरी येथिल शेतशिवारातुन सापळा कार्यवाही केली. कार्यवाही करीत असतानां माझे गळयात व्हाईस रेकॉर्डर लावून, पावडर लावलेल्या चलनी नोट ज्यात १००/— रू. च्या ५ नोटांचा समावेश होता, त्या माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. सपाटे यांचे हस्ते ठेवुन श्री. चवरे, तलाठी,

प्रविण बोरीकर

खबर
दिल्या.
श्री. चवरे

Form : 1-C

(3)

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

No. 0025090

आज रोजी तक्रार प्राप्त झाल्याने उशीर.

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

10. *Total value of properties stolen/involved : —
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any : —
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ): प्रकरण अशा प्रकारे आहे - नमूद घटना ता. वेळी
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) :
व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपले लोकसेवक पदाचा गैर फायदा घेऊन स्वतःचे आर्थिक फायद्या-
करीता यातील फिर्यादी यांचे वडिलांचे नावचे असलेली शेती वारसानचे नावे फेरफार करण्यासाठी
पंचाहत्तरी कार्यालयात दरम्यान ४००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारल्याने तक्रारी दखलपात्र
सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed*.......................... Rank.......................... to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S.......................... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले पुरुषोत्तम ओहेकर यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या पदनाम पोलीस निरीक्षक .......... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.
मुद्यावर .......... लाच ब्युरो

F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

[signature]

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

[signature]
Signature of the Officer-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : सुभाष डी. हरबार
नाव

*Rank : पो. ना. No. ११४० पोलीस ठाणे
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : ११/१०/२०१९ चे ११.३० वा.
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

यांचे कार्यालयात गडेगाव पाठविले असता ते त्यांचे कार्यालयामध्ये हजर नव्हते, त्यामुळे कुळल्याही प्रकारचा ईशारा न करता तहसिल कार्यालय लाखनी येथे जावुन चवरे तलाठी यांचा शोध घेतला असता ते तिथेही हजर न मिळुन आल्याने व मी त्यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद असल्याने, मी कुठल्याही प्रकारचा ईशारा न करता सुचनेप्रमाणे परत खुटसावरी फाट्याचे परिसरात परत आलो. त्यानंतर सापळा अधिकारी यांना माहीती देवुन, ॲसीबी भंडारा येथे पंच व सापळा पार्टीसह परत आलो. याबाबात अहेरकर साहेबांनी पंचनामा तयार केला आहे.

दिनांक २४/०९/१९ रोजी श्री. चवरे तलाठी, तलाठी कार्यालय गडेगाव ता. लाखनी जि. भंडारा यांनी मला माझ्या वडीलांचे नावाने असलेली शेती, वारसानाचे नावे फेरफार करण्यासाठी ५००/— रूपये, लाचेची मागणी करून ती मिळविण्याचा प्रयत्न केला आणि दिनांक २५/०९/१९ रोजी श्री. चवरे तलाठी यांना त्यांनी मागितल्याप्रमाणे लाच देण्याकरीता मी पंचासोबत त्यांचे कार्यालयात गडेगाव येथे व तहसिल कार्यालय लाखनी येथे गेलो परंतु ते हजर मिळाले नाही व त्यांचा फोन बंद होता. त्यानंतर मी तिन—चार दिवश चवरे तलाठी हे कार्यालयात आले का यांची पाहनी केली परंतु ते कार्यालयात आले नाही. त्यामुळे मी श्री. चवरे तलाठी, तलाठी कार्यालय गडेगाव यांचे विरूध्द ॲन्टी करप्शनकडे तक्रार केल्याचा त्यांना संशय आल्याने ते आता माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत. याची मला मला खात्री झाली. त्यांनतर मी शेतीचे कामात असल्याने ॲन्टी करप्शन कार्यालयात मला येता आले नाही. आज रोजी वेळ मिळाल्याने मी त्यांचेविरूध्द कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देण्यास आलो आहे. त्यामुळे चवरे तलाठी यांनी मला वरिल प्रमाणे ५००/— रू. लाचेची मागणी करून लाच मिळविण्याचा प्रयत्न केल्याने श्री. चवरे तलाठी, तलाठी कार्यालय गडेगाव ता. लाखनी जि. भंडारा यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाहीस्तव: मी फिर्याद देत आहे.

माझी वरिल फिर्याद मी वाचून पाहीली, ते माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

प्रविण बोरीकर
10.10.2019